नि.दि.दा.क्र. ५१/२०२१
तेजराव वि. भानूदास,

नि.क्र. १३ लगत आदेश
(दि.१९.०१.२०२३)

१. प्रतिवादी यांनी त्यांचा लेखी जबाब व म्हणणे दाखल करण्यास परवानगी मिळावी करिता अर्ज दिला असून प्रतिवादी हे मागील तारखेला आजारी असल्यामुळे व कोरोणा महामारीमुळे न्यायालयात वेळेच्या आत लेखी जबाब दाखल करू शकले नाही. त्यामुळे आजरोजी त्याबाबत परवानगी द्यावी म्हणून अर्ज असे.

२. सदर अर्जास वादीच्या वकीलांनी विरोध दर्शवुन असे कथन केले की, प्रतिवादीने मुदतीमध्ये लेखी जबाब दाखल केला नाही. प्रकरणात तातडीने चौकशी व्हावी म्हणून प्रतिवादींकडून रक्कम रूपये ५००/- चा दंड घ्यावा.

३. अर्ज व म्हणणे वाचले. प्रकरण पडताळले. प्रतिवादी क्र. १ यास दाव्याचे समन्स ०४.०८.२०२१ रोजी नि.क्र. ७ प्रमाणे रुजू झाले आहे आणि सदरचा अर्ज ०८.१२.२०२१ रोजी दाखल केलेला आहे. अशास्थितीत दि.प्र.सं. आदेश ८ नियम १ व त्यातील तरतुदींचा विचार करता विशिष्ट परिस्थीतीमध्ये ९० दिवसांमध्ये लेखी जबाब दाखल करण्याची परवानगी प्रतिवादीला आहे. सदर कामामध्ये प्रतिवादींच्या कारणांचा विचार करता सप्टेंबर २०२१ नंतर कोरोना महामारीचा कालावधी नव्हता अशास्थितीत तरतुदीनुसार ९० दिवस वगळता प्रतिवादी क्र. १ यास १ महिन्याचा उशिर त्याचा लेखी जबाब दाखल करण्यास झालेला दिसतो. अशास्थितीत प्रतिवादी क्र. २ व ३ देखिल दाव्याच्या कामी नि.क्र. १६ नुसार हजर झाले असून प्रतिवादी क्र. १ ची परवानगी जी लेखी जबाब दाखल करण्यास मागत आहे त्या अर्जाचा विचार करता लेखी जबाब हा प्रतिवादी क्र. ३ नेच अभिलेखावर दाखल केलेला आहे. अशास्थितीत दि.प्र.सं. कलम १५१ चा विचार करता प्रतिवादी क्र. १ यास प्रतिवादी क्र. २ व ३ करिताचाही लेखी जबाब अभिलेखावर घेण्याच्या अर्जास रक्कम रूपये

२००/- दंड करून अर्ज मंजुर करण्यास कोणतीच हरकत नाही असे मला वाटते. सबब, अर्जाच्या उत्तरादाखल मी खालील प्रमाणे आदेश पारित करिता आहे.

आदेश

१. अर्ज नि.क्र. १३ हा रक्कम रूपये २००/- च्या दंडासह मंजुर करण्यात येत आहे.

२. दंडाची रक्कम प्रतिवादी क्र. १ ने वादीला दिल्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ३ चा लेखी जबाब व मनाई हूकूमाच्या अर्जास म्हणणे अभिलेखावर घेतले जाईल.

स्वा/-

दि.१९.०१.२०२३.

शैलेश यु. कंठे
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
देऊळगावराजा.

मी रुपेश अशोक दांडगे, लघुलेखक, (दिवाणी न्यायालय, कनिष्ठ-स्तर, देऊळगावराजा, ता.देऊळगावराजा, जि. बुलडाणा.) याची पुष्टी करतो की, या पी.डी.एफ.ची सामग्री ही मुळ आदेशाच्या शब्दाप्रमाणेच शब्द आहे.